अतारांकित प्रश्नोत्तरांची १७५ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### चाकूर (जि.लातूर) येथील सहकारी वसाहतीतील भूखंडावर उदृयोग सुरु करण्याबाबत

**(१) ३३०४९ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) येथील सहकारी औद्योगिक वसाहतीतील १४० भूखंडाचे वाटप सन १९८७ मध्ये करण्यात आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी १४० भूखंडापैकी फक्त २४ भूखंडावर उदृयोग सुरु करण्यात आले असून उर्वीरित भूखंड तसेच अपूर्ण अवस्थेत पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सदंर्भात शासनाने कोणती चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. उदय सामंत (१६-०६-२०२३) :** (१) भूखंडाचे वाटप सभासदांच्या मागणीनुसार टप्याट्प्याने करण्यात आलेले आहे. सहकारी संस्थेची नोंदणी दि.१३/०८/१९९७ रोजी झाली. सभासदांच्या मागणीनुसार उद्योग उभारणीसाठी माहे जुलै-१९९१ पासून भूखंड वाटपास सुरुवात झाली असून सन-२०२१ पर्यंत एकूण ११६ भूखंड वाटप करण्यात आले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर १४० भुखंडापैकी सध्या ४० भुखंडावर उद्योग सुरु असून नवीन २० उद्योजकांनी आपल्या भुखंडावर बांधकाम करण्यासाठी सुरुवात केली आहे. तसेच ८ उद्योग आजरी उद्योग आहेत. उर्वरीत ७२ भुखंड धारक उद्योजकास उद्योग चालू करण्यासाठी नोटीस दिलेल्या आहेत. यापूर्वी ३४ भूखंड धारकावर कार्यवाही करुन भूखंडाचे पुर्नवाटप केले आहे. तसेच PMEGP व CMEGP योजने अंतर्गत प्रस्ताव मंजूर होण्याच्या दृष्टीने भुखंड धारक उद्योजकास जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांनी संस्थेच्या सहकार्याने भुखंडावर उद्योग स्थापन करण्याच्या दृष्टीने भुखंड उद्योजकता शिबीराचे आयोजन वेळोवेळी करण्यात आलेले आहे. जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने संपूर्ण भुखंडावर उद्योग करण्याबाबत संस्थेस पत्रव्यवहार मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. तसेच औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास या योजने अंतर्गत संस्थेमध्ये नुकतेच अंतर्गत पायाभूत सोयी सुविधांची कामे ज्यात अंतर्गत संपूर्ण डांबरीकरण रस्ते, सिमेंटची गटारे, अंतर्गत पाणी पुरवठा पाईप लाईन इत्यादी कामे रु.३७८.१९ लक्ष किंमतीची केली आहेत. ज्यात संस्थेचा २५ टक्के वाटा रु. ९४.५४७ लक्ष एवढया रक्कमेचा आहे.

तसेच संस्थेने स्वखर्चातून संपूर्ण भुखंडधारकाच्या प्लॉट पर्यंत ३ फेस विदयुत लाईन पुरवठा केला असून संपुर्ण पोलवर पथदिवे बसवलेले आहे. सद्यस्थितीत संस्थेकडे कायम स्वरुपी पाणी पुरवठाचे काम अपूर्ण आहे व कायम स्वरुपी लाईट (Express Feeder) या दोन्ही गोष्टी नसल्यामुळे संपूर्ण उद्योग उभारणीसाठी अडचण येत आहेत

जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांनी संस्थेस उद्योग उभा करण्याच्या दृष्टीने सूचना केल्या असून जे भुखंडधारक भुखंडावर उद्योग स्थापन करणार नाहीत अशा भुखंड धारकांचे भूखंड संस्थेने ताब्यात घेवून प्रतिक्षा यादीनुसार गरजू व उत्पादन उद्योग स्थापन करुन इच्छिणाऱ्या उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्याबाबत कळविले आहे. संस्थेने उद्योग स्थापन न करणा-या भूखंड धारकावर भूखंड ताब्यात घेण्यासाठी कार्यवाहीच्या नोटीसा पाठविल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परिक्षा (NMMS) परिक्षा घेण्याबाबत**

**(२) ३३१०६ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत राष्ट्रिय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (NMMS) परिक्षा घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९-२०२० मध्ये घेण्यात आलेल्या NMMS परिक्षेमध्ये खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांवर परिक्षा परिषद, पुणे यांच्याकडून दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे परीत्रपत्रकामध्ये NTS परिक्षा परिक्षेमध्ये EWS प्रवर्गाकरीता १० टक्के जागा आरक्षित करण्याबात स्पष्ट उलेल्ख आहे परंतू दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या अधिसुचनेमध्ये EWS आरक्षणाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नसल्याने खुल्या प्रवर्गातील शेकडो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासुन वंचित राहिलेले आहेत,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मलकापूर पंचायत समिती अंतर्गत गेल्या चार वर्षात राष्ट्रिय आर्थिक दुर्बल घटक (एन एम एम एस) या राष्ट्रीय स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेले झोडगा, वडोदा, घिर्णी, आळंद, पान्हेरा, वरखेड, भाडगणी इत्यादी गावांमधील २०१७-२०१८ मध्ये ३, २०१८-२०१९ मध्ये १९, २०१९-२०२० मध्ये १० याप्रमाणे एकंदर ३२ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने राष्ट्रिय आर्थिक दुर्बल घटकातील शिष्यवृत्ती पासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१६-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

NMMS या शिष्यवृत्ती परिक्षेकरीता निर्धारीत करण्यात आलेल्या एक लाख पैकी महाराष्ट्राचा कोटा ११६८२ इतका आहे. सन २०२१ मध्ये जाहीर केलेल्या निवड यादीमध्ये सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १२.०२.२०१९ नुसार EWS प्रवर्गाकरीता १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्या दिनांक ६.११.२०२० च्या अधिसूचनेनुसार राज्याच्या संवर्गनिहाय आरक्षणानुसार विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येणार असल्याबाबत नमूद केले आहे.

(३) हे खरे नाही

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

**रत्नागिरी जिल्हयात मे.ओम कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराने रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची केल्याबाबत**

**(३) ४५८३२ (२५-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात मे.ओम कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराने दापोली तालुक्यातील महाड, लाटवण, विसापूर, दापोली, उंबरघर रस्ता, रेवस रेड्डी रस्ता, मंडणगड पालवणी खेर्डी रस्ता, दापोली तालुक्यातील आडे, आंजर्ला, कांदिवली, दहागांव या रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची केल्याने त्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०९-०६-२०२३) :** (१) व (२) तोंडी तक्रार प्राप्त आहे.

प्रश्नाधीन रस्त्यांपैकी महाड लाटवण विसापूर दापोली उंबरघर रस्ता रामा ९७ चे कि.मी. ४०/००० ते ४७/५०० मध्ये सुधारणा व डांबरीकरण करणे, आडे आंजली कादिवली दहागाव रस्ता रामा १३८ चे कि.मी. २७/०१० येथील पूलाच्या पुर्नबांधणीचे काम, रेवस रेडी रस्ता प्रजिमा क्र.४ कि.मी. ४९२/०० ते ४९९/०० तसेच कि.मी.५४२/०० ते ५४४/२०० मध्ये सुधारणा व डांबरीकरण करणे ही कामे मे. ओम कंस्ट्रक्शन यांना देण्यात आली असून, ही कामे भौतिकदृट्या समाधानकारकरित्या पूर्ण झाले आहे व सुस्थितीत आहे. तसेच मागिल २ वर्षामध्ये या रस्त्यावर मे. ओम कंस्ट्रक्शन यांचे मार्फत या कामा व्यतिरिक्त कोणतेही काम झालेले नाही.

मंडणगड पालवणी खेडी रस्ता रामा १३७ दापोली तालुक्यामध्ये मागील २ वर्षामध्ये कोणतेही काम मे. ओम कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री, बाबरा, नाचनवेल, घाटनांद्रा, तिडका, सातगांव, पाचोरा, जळगांव पर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ता क्रमांक-४८ येथील घाटाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) ४६७९२ (२५-०९-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री, बाबरा, नाचनवेल, घाटनांद्रा, तिडका, सातगांव, पाचोरा, जळगांव पर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ता क्रमांक-४८ चे दोन लेनमध्ये सिमेंटीकरण करुन घाटनांद्रा घाटाची दुरुस्ती करण्यात यावी, तसेच पाचोरा खान्देश जळगांव ते फुलंब्री औरंगाबाद अत्यंत कमी अंतराने जोडून फुलंब्री ते पाचोरा रस्त्यावर दोन लेनमध्ये सिमेंटीकरण करण्याची नाचनवेल ग्रामपंचायने केंद्रीय रस्ते व वाहतूक महामार्ग मंत्री, भारत सरकार यांना माहे मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०६-२०२३) :** (१) सदर निवेदन प्राप्त नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याबाबत

**(५) ४६८५५ (१७-०९-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्यासाठी राज्य परीक्षा परिषदेकडून पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाची शासन दखल घेत नसल्याची बाब दिनांक १७ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्तीच्या तुटपुंज्या रक्कमेअभावी विद्यार्थी सदर परीक्षा गांभीर्याने घेत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१६-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही

(३) इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी च्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## एआयसीटीईची मान्यता असलेल्या अभियांत्रिकी आणि व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमाबाबत शासनाने ठोस निर्णय घेण्याबाबत

**(६) ४९५२९ (१८-०१-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), अॅड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये जुलैपर्यंत देशात एआयसीटीईची मान्यता असलेल्या अभियांत्रिकी आणि व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या तब्बल १४ लाखाहून अधिक जागा रिक्त असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियांत्रिकी आणि व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमाबाबत शासनाने कोणती ठोस भुमिका घेतली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे संकतेस्थळी प्रसिध्द माहितीनुसार सन २०२०-२१ करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांची देशात ३०.८६ लाख प्रवेश क्षमतेपैकी १६.७७ लाख प्रवेश झाले असून १४.०८ लाख जागा रिक्त आहेत.

(२) भारत सरकारच्या अेआयसीटीई अॅक्ट १९८७ नुसार तंत्र शिक्षण व्यावसायिक अभ्यासक्रम शैक्षणिक संस्था सुरु करणे, विद्यमान संस्था बंद करणे, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, विद्यमान अभ्यासक्रम बंद करणे इ.बाबतची मान्यता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचे प्राधिकारातील आहे.यास्तव तंत्र शिक्षणाच्या संस्थाच्या मान्यतेबाबतचा धोरणात्मक निर्णय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेमार्फत घेण्यात येतो.

महाराष्ट्र राज्यात शै.व. २०१५-१६ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांच्या बृहत् आराखडयामध्ये नवीन अभियांत्रिकी संस्था सुरु करण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना राज्यात नवीन अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थांना शै. व. २०१८-१९ मध्ये मान्यता देण्यात येऊ नये अशी शिफारस शासनाने दि.१६ जानेवारी २०१८ च्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना कळविली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बलसा (ता.पूर्णा, जि.परभणी) ते मिरखेल (ता.जि.परभणी) स्टेशन या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(७) ५०१८५ (१८-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बलसा (ता.पूर्णा, जि.परभणी) ते मिरखेल (ता.जि.परभणी) स्टेशन या रस्त्याची गत १० ते १५ वर्षापासून दुरुस्ती करण्यात न आल्याने सदर रस्त्यावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची डागडुजी करुन दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी बलसा, महातपुरी, खांबेगाव, शिरकळस, तामकळस येथील स्थानिक ग्रामस्थ, विद्यार्थी यांच्यासह विविध संघटनांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सदर बाबत निवेदन प्राप्त नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातुर जिल्ह्यातील लांबोटी ते तोगरीमोड व उस्मानाबाद-उजनी रस्त्याच्या बांधकामाबाबत

**(८) ५०५८९ (१८-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात हायब्रीड ॲन्युईटी प्रकल्पा अंतर्गत निलंगा ते लांबोटी-तोगरीमोड या २८ किलोमीट रस्त्याचे बांधकाम स्वतंत्र अभियंते, कार्यकारी अभियंते, उपकार्यकारी अभियंते यांच्या संगनमताने निकृष्ठ दर्जाचे होत असून यासाठी अत्याधुनिक पध्दतीच्या प्लॅन्टची उभारणी करण्याची आवश्यकता असतांना जुन्या व मोडकळीस आलेल्या प्लँटवरुन १० पट काम झाल्याचे दाखविण्यात आले असल्याचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद - उजनी रस्त्याच्या कामासंदर्भात संबंधित कार्यकारी अभियंता यांनी औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या स्थगीती आदेशाचे उल्लंघन करुन बनावट मोजमापे घेऊन रस्त्याचे निकृष्ठ बांधकाम करुन शासनाच्या निधीचा अपहार केल्याप्रकरणी स्थानिक शेतकऱ्यांनी संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने गुण नियंत्रण मंडळाकडून (क्वालिटी कंट्रोल विभागामार्फत) चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सदर प्रकल्पाचे काम हायब्रीड अन्युईटी योजनेअंतर्गत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे करण्यात येत असून सद्यस्थितीत ७५% काम पूर्ण करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
सदर प्रकल्पाचे काम हायब्रीड अन्युईटी योजनेअंतर्गत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे करण्यात येत असून सद्यस्थितीत ७५% काम पूर्ण करण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालयाने सा.बां. विभागाच्या अख्यत्यारीतील रस्त्याच्या रुंदीमध्ये काम करण्यास मुभा दिली आहे.
(३) सदर कामांची तपासणी अधिक्षक अभियंता दक्षता व मुणनियंत्रण मंडळ यांचे कडून करण्यात आली आहे. त्यामध्ये सुचविलेल्या मुद्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लांबोटा-तोगरी (ता.देवणी, जि.लातूर) रस्त्याचे प्रलंबित काम सुरु करणेबाबत

**(९) ५०५९० (१८-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लांबोटा-तोगरी (ता.देवणी, जि.लातूर) रस्त्यावर खोदकाम करुन मागील तीन महिन्यांपासून हे काम बंद ठेवण्यात आल्यामुळे अनेकजण खड्ड्यात पडून तसेच वाहने घसरुन काही जण जखमी झाल्याचे दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षित कार्यप्रणालीमुळे नागरिकांच्यावतीने आंदोलन करण्यात येऊनही याची दखल घेण्यात न आल्यामुळे सदर प्रलंबित काम तात्काळ सुरु करण्याची मागणी ग्रामस्थ व वाहनचालकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०६-२०२३) :** (१) सदर रस्त्याचे काम सदयस्थितीत प्रगतीत असून ७५% काम पुर्ण झाले आहे. रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेंबाळपिंपरी, पुसद, गुंज, धनोडा, माहूर या तालुक्यातील हायब्रीड ॲन्युटीअंतर्गत रस्त्यावरील पुलाच्या रुंदीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ५१५३८ (१८-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेंबाळपिंपरी, पुसद, गुंज, धनोडा, माहूर या तालुक्यातील खडका, शिरपूर, गुंज, चिलगव्हाणमार्गे पुसदला जाणाऱ्या रस्त्यावरील हायब्रीड ॲन्युटीअंतर्गत तीन वर्षापासून सुरु असलेल्या कामांसाठी आतापर्यंत सुमारे रुपये ६६० कोटी ८१ लाखांचा खर्च होऊनही या रस्त्यावरील पूलाचे रुंदीकरण केले नसल्यामुळे अपघात होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबधित अभियंत्याचा अनुभव कमी असल्याने तसेच त्यांचे कामावर व संबधित ठेकेदारावर नियंत्रण नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही. सदरचे काम सद्यस्थितीत करारनाम्यातील तरतूदी प्रमाणे प्रगतीत असून ७५% भौतिक प्रगती साध्य झाली आहे. सदर प्रकल्पात ३० मीटर वरील लांबीचे मोठया पुलांचे रुंदीकरणाची कामे समाविष्ट नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात मुसळधार पावसामुळे नीरा येथील बुवासाहेब ओढयावरील पूल वाहून गेल्याबाबत**

**(११) ५१७५० (१८-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे नीरा येथील बुवासाहेब ओढयावरील पूल वाहून गेल्याने ग्रामस्थांना वाहतुकीसाठी अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त पूलाचे काम तातडीने पूर्ण करुन ओढयावर आणखी एक मोरी बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

दि.६/०९/२०२२ रोजी पुरंदर तालुक्यातील निरा गावाजवळ असणाऱ्या बुवासाहेब ओढयाच्या येथे ढगफुटी सदृश्य पाऊसामुळे पाण्याची पातळी वाढून इंदापूर बारामती निरा रस्ता रा.मा.१२१ वरील सा.क्र. कि.मी.८८/९५० येथील नविन पुलाचे बांधकामासाठी तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या स्वरुपाच्या वळण रस्त्यावर पाणी येऊन वाहतुक काही कालावधीसाठी बंद पडली होती. पाणी ओसरल्यानंतर रस्त्याची किरकोळ दुरुस्ती करुन रस्ता वाहतूकीकरीता पूर्ववत करण्यात आला आहे.

(२) मुख्य पुलाचे काम पूर्ण झाले असून जोड रस्त्यावर भरावाचे व खडीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. सदर ठिकाणी आवश्यक लांबीचा पूल बांधण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव-बनवस-मरडसगाव (जि.परभणी) रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१२) ५२३१३ (१८-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील राज्यमार्ग क्र.२३५ वरील मालेगाव-बनवस-मरडसगाव येथील रस्त्याचे काम केटीआयएल कंपनीने पुर्ण केले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फायनल कोट, दिशादर्शक फलक तसेच रात्री दिसणारे रेडिअम बल्ब व व्हाइट दुभाजक गावाचे फलक लावले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बस स्थानक परिसरात दोन्ही बाजूने १०-१० फुटाची बंदिस्त नाली तसेच अनेक जागी लाईटचे पोल नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत सखोल चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर कारवाई करणे तसेच दोषी अधिका-यास अटक करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

रस्त्याचा फाईनल डांबरीकोट प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीत झालेला आहे. रस्त्यावरील मध्यभागी व दोन्ही डांबरी किनाऱ्यावर व्हाईट मार्किंगचे काम हे पुर्ण झालेले आहे. डांबरी रस्त्याच्या दोन्ही बाजूचे एक मीटरचे मुरुम शोल्डर्सचे काम सध्यस्थितीत काही ठिकाणी पुर्ण झालेले आहे व काही ठिकाणी प्रगतीपथावर आहे. ज्या ठिकाणी शोल्डर्सचे काम पुर्ण झालेले आहे त्या ठिकाणी महत्वाचे फलक IRC च्या मानकानुसार लावण्यात आलेले आहे. उर्वरित सर्व ठिकाणी महत्वाचे फलक हे शोल्डर्सचे काम पुर्ण झाल्यानंतरच IRC/MoRTH च्या मानकानुसार लावण्याचे काम प्रगतीत आहे.

(३) हे खरे नाही.

बस स्थानकाच्या ठिकाणी दोन्ही बाजुस क्राँक्रीटची नालीचे बांधकाम झाले आहे. लाईट पोल हे करारनाम्यात अंतर्भूत नसल्यामुळे लावण्यात आले नाहीत.

(४) मुख्यमंत्री पोर्टल वर या आशयाची तक्रार प्राप्त आहे.

(५) सदरचे काम करार नाम्यातील तरतूदीप्रमाणे करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कामण-भिवंडी, मनोर-भिवंडी व शिरसाड-वाशिंद (जि.पालघर) या रस्त्यांच्या**

**बांधकामांसाठी ना-हरकत दाखला मिळणेबाबत**

**(१३) ५२३६३ (१८-०१-२०२३). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील कामण-भिवंडी, मनोर-भिवंडी व शिरसाड-वाशिंद ह्या रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच मा. मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती व बांधणी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महामार्गाच्या माध्यमातून करणार असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्यांच्या बांधकामासाठी लागणारा संपूर्ण निधी केंद्र शासनाकडून देण्यात येणार असून यास्तव महाराष्ट्र शासनाकडून ना-हरकत दाखला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१६-०६-२०२३) :**(१) होय,खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवण (ता.कळवण, जि.नाशिक) येथील हायब्रीड ॲन्युइटी रस्त्याचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(१४) ५२६३३ (१८-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नामपूर-सटाणा- कळवण-वणी रस्ता रा.म 20 हा रस्ता हायब्रीड ॲन्युइटी योजनेंतर्गत सन 2014 मध्ये मंजुर असून सदर रस्त्याचे काम संथगतीने सुरु असल्याने तसेच मक्तेदाराच्या चुकीमुळे दिनांक 9 ऑक्टोबर, 2022 रोजी वा सुमारास २ नागरिकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम हे सन 2014 ते 2019 या पाच वर्षाच्या काळात अनेक कारणाने दुर्लक्षित राहिल्याने कळवण शहरातील नागरिकांना धुळीमुळे श्वसनाचे विकार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यांस जबाबदार संबंधित मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनीधी यांनी मा.पालकमंत्री यांच्याकडे जिल्हा वार्षिक योजना डीपीडीसी बैठकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०६-२०२३) :** (1) प्रश्नांकीत नामपूर-सटाणा- कळवण-वणी रस्ता रा.म 20 हा रस्ता हायब्रीड ॲन्युइटी योजना पॅकेज क्र. NSK-54 अंतर्गत प्रगतीत असुन सद्यस्थितीत चौथा माईलस्टोन पर्यंतचे काम पुर्ण झाले आहे.

प्रश्नांकीत रस्त्यावर दिनांक 9 ऑक्टोबर, 2022 रोजी अपघात झाला असुन बस चालकाने भरधाव वेगाने व बेदरकारपणे बस चालवून मोटार सायकलीस पाठीमागून ठोस मारल्याने अपघात झाल्याची नोंद संबंधित पोलीस स्टेशनकडील F.I.R. मध्ये आहे.

(2) हे खरे नाही.

(3) हे खरे आहे.

(4) सदर अपघातास कारणीभुत असलेल्या बसचालकास अटक करण्यात आली असुन सदर कामाच्या मक्तेदारांवर गुन्हा

दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील हिंगणा आणि बुटीबोरी येथील औद्योगिक वसाहतील रस्ते अत्यंत खराब असल्याबाबत**

**(१५) ५२९०४ (१८-०१-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील हिंगणा आणि बुटीबोरी येथील औद्योगिक वसाहतील रस्ते अत्यंत खराब असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगणा आणि बुटीबोरी एमआयडीसी मधील रस्त्यांवर बऱ्याच ठिकाणी डांबर नसून त्याअंतर्गत रस्ते खराब झाल्याचेही निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता दुरूस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
सन २०२२ च्या पावसाळयामध्ये अतिवृष्टीमुळे हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील सी, के, डी, एन, आणि एस लेआऊट मधील रिलायन्स कंपनी समोरील रस्त्यावर काही ठिकाणी खड्डे पडल्याने रस्ते खराब झाले होते.
(३) हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यावरील डांबरीकरणाने खड्डे बुजविण्याचे काम दि. २२/१२/२०२२ पासून सुरू करण्यात आले असून, सदर कामाचा कालावधी दि.२१/०३/२०२३ पर्यंत होता. सदर काम पूर्ण झाले.
बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांवरील डांबरीकरणाने खड्डे बुजविण्याचे काम करारनामा क्र. बी-१/१९ सन २०२२-२०२३ अन्वये दि.२२/११/२०२२ पासून सुरू करण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे व सदर कामाचा कालावधी दि.२१/०५/२०२३ पर्यंत आहे. बी,एफ पी, आय, डी, एच व जे आराखड्यातील रस्त्यांचा पुन: डांबरीकरणाचा प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील अ परिमंडळ विभागातील जे बी ग्रेन डीलर्स असोसिएशनवर कारवाई करण्याबाबत**

**(१६) ५३०३१ (१८-०१-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील अ परिमंडळ विभागात रेशन धान्य दुकानात धान्य पुरवठा करणाऱ्या जे बी ग्रेन डीलर्स असोसिएशन यांचेकडून प्रत्येक क्विंटल मागे ४०-६० रुपये हमाली दिली तरच धान्यपुरवठा करण्यात करण्यात येईल असे संबंधित रेशन धान्य दुकानदारांना सांगण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याविरोधात माटुंगा लेबर कॅम्प येथील बालाजी किराणा स्टोअर्स (१७अ ९८) व इतर रेशन धान्य दुकानदार यांनी नियंत्रक शिधा वाटप यांना दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास व रेशनिंग ऑफिसर धारावी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास तसेच तत्कालीन मा.मुख्यमंत्री व अन्न नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेकायदेशीर पैसे मागणाऱ्या जे बी ग्रीन डीलर्स असोशियन विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) यासंदर्भात दि.२३/०५/२०२२, दि.११/११/२०२१ व दि.१३/१२/२०२१ रोजीच्या पत्रांन्वये तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(३) मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील अ परिमंडळ विभागातील अन्नधान्य वाहतूक कंत्राटदार श्री. जे बी ग्रेन डीलर्स असोसिएशन यांच्याविरोधात अधिकृत शिधावाटप दुकान क्र.१७ अ ९८ यांनी हमाली मागत असल्याबाबत यापूर्वीही तक्रारी केल्या असून त्याबाबत कोणतेही ठोस पुरावे उपलब्ध नाहीत.

तथापि, वाहतूकदार जे.बी.ग्रेन डीलर्स असोसिएशन यांनी जानेवारी, २०२१ ते जून, २०२२ या कालावधीत तक्रारदारांच्या स्वस्त धान्य दुकानांमध्ये अन्नधान्याचे वितरण मुदतवाढीच्या अखेरच्या तारखेस केले असल्याचे चौकशीमध्ये आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध दि.१४.१२.२०२२ च्या आदेशान्वये दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर, बुलढाणा, चिखली, देऊळगाव राजा ते जालना तसेच चिखली ते तारखेड रस्त्याचे काम वेळेत पूर्ण करण्याबाबत**

**(१७) ५३२४० (१८-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर, बुलढाणा, चिखली आणि देऊळगाव राजा ते जालना राष्ट्रीय महामार्ग ७५३ तसेच चिखली ते तारखेड हा ६१ किलोमीटर दरम्यानचा रस्ता चौपदरी करण्यासाठी वन विभागाची परवानगी आवश्यक होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यासाठी सदर वन जमीनीचा वापर करताना वनसंपदेचे नुकसान न करता रस्ता तयार करण्यासाठी तोडलेले वृक्ष तसेच जलस्त्रोत यांची नव्याने बांधण्याची पूर्तता संबंधित एजन्सीकडून शासन करुन घेणार असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग २ नुसार रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे काय तसेच सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम उत्कृष्ट दर्जाचे व निश्चित वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०६-२०२३) :** (१) मलकापूर -बुलढाणा-चिखली राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३-ए या रस्त्याची लांबी १५१.५३ किमी आहे. यापैकी ७१.६७ किमी लांबी सा.बां.विभागाच्या खाजगीकरणांतर्गत प्रकल्पात समाविष्ट आहे. उर्वरित चिखली - टाकरखेड- जालना ७९.८६ किमी ही लांबी राष्ट्रीय महामार्ग विभाग यांचे अखत्यारीतील आहे. सदर लांबीतील टाकरखेड ते जालना (लांबी ४०.२६ किमी) यामध्ये १.४० किमी लांबी जालना वनक्षेत्रातील असल्याने याकरिता उपवनसंरक्षक, वनविभाग, औरंगाबाद यांची दि.११.११.२०२२ रोजी तत्वत: मंजुरी प्राप्त झाली आहे.
(२) व (३) सदर रस्त्यातील चिखली ते टाकरखेड लांबीचे काम अस्तित्वातील रस्त्याच्या रुंदीमध्येच करण्यात आले असून वृक्ष तोडण्याची व जलस्त्रोत नव्याने बांधण्याची आवश्यकता न पडल्याने वनसंपदेचे नुकसान न करता पुर्ण करण्यात आले आहे.

तसेच टाकरखेड ते जालना रस्त्याच्या ३८.८६ किमी लांबीतील काम पुर्ण झाले असून उर्वरित १.४० किमी वनक्षेत्रातील लांबीमध्ये १.१० किमी रस्त्याचे काम पुर्ण झाले असून सद्यस्थितीत ३०० मी. रस्त्याचे काम प्रलंबित आहे. सदरील ठिकाणच्या विद्युत डीपीचे स्थलांतरण होताच उर्वरित काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

उपरोक्त काम व इतर अनुषंगिक कामे जून २०२३ अखेरपर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या निकषानुसार मराठा समाजातील विद्यार्थ्यांना**

**प्रतिवर्षी साठ हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याबाबत**

**(१८) ५३३७५ (१८-०१-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या निकषानुसार मराठा समाजातील विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी साठ हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा समाजातील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे पदवीत्तर पदवीसाठी दरवर्षी ३० लाखाच्या मर्यादेत आणि पी. एच. डी. साठी ४० लाखाच्या मर्यादेत शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०७-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मंत्रिमंडळ उपसमितीने दि.११.१०.२०२२ रोजी डॉ.पंजाबराब देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेच्या निर्वाह भत्त्याच्या रकमेत वाढ करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार डॉ.पंजाबराब देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत निर्वाह भत्त्याच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव कार्यवाहीखाली आहे.

(२) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्यातील खुल्या प्रवर्गातील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी दि.०४ ऑक्टोबर, २०१८ शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आली असून यामध्ये मराठा समाजातील विद्यार्थ्यांचाही समावेश होतो. सदरच्या शासन निर्णयान्वये खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) वर्ल्ड रँकींग २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यांत येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली औद्योगिक वसाहतीमधील उद्योग / कंपन्या गुजरात राज्यात स्थलांतरीत होत असल्याबाबत**

**(१९) ५३७४४ (१८-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली औद्योगिक वसाहतीमध्ये सद्य:स्थितीत जवळपास ४२० पेक्षा अधिक कंपन्या कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली औद्योगिक वसाहतीमध्ये कार्यरत असलेल्या उद्योगांना / कारखान्यांना विस्तारीकरणासाठी वाव नसल्याने तसेच या औद्योगिक वसाहतीमध्ये होत असलेल्या स्फोटांच्या व प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या कारणास्तव या ठिकाणी सद्य:स्थितीत कार्यरत असलेले व वार्षिक उलाढाल जवळपास ५० कोटीपेक्षा अधिक असणारे सुमारे १२ मोठे उद्योग / कंपन्या गुजरात राज्यात स्थलांतरीत होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२१-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात उद्योग विस्तारा करीता पुरेसा वाव नसून वाटपा करीता भूखंड उपलब्ध नाही. सद्यस्थितीत डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेले उद्योग पूर्ण कार्यक्षमतेने सुरू आहेत.

तथापि स्फोटांच्या व प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या कारणास्तव गुजरात राज्यात स्थलांतरीत होत आहेत ही बाब खरी नाही.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील उद्योग व इतर मोठे कारखाने व कंपन्या सुरळीतपणे चालू असून यापैकी कुठल्याही कारखान्यांनी त्यांचे उत्पादन कमी झाल्याबाबत कळविलेले नाही, तसेच त्यांच्या मासिक पाणी पुरवठ्याचे प्रमाण कमी झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील रस्ते व ओंढयावरील पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) ५४२४२ (१८-०१-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या दरम्यान झालेल्या मुसळधार पाऊस व गारपीटीमुळे रस्ते व ओढयांवरचे छोटे पूल नादुरुस्त झाले असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्ते व छोटे पूल यांच्या दुरुस्तीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे कामांच्या यादीसह निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनावर निर्णय घेऊन व निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्ते व पूल सुस्थितीत आहेत.

(२) जुन्नर तालुक्यातील रस्ते व पुलांच्या दुरुस्तीच्या बाबतीत निवेदन प्राप्त नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रात खाजगी सहकारी साखर कारखान्यावरील वजन काट्यामध्ये फेरफार करुन ऊसाची चोरी करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२१) ५४६२९ (२४-०१-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात सहकारी व खाजगी साखर कारखान्यांवर असलेल्या वजन काट्यामध्ये फेरफार करुन शेतकऱ्यांच्या ऊसाची चोरी केली जात असल्याच्या तक्रारी विविध नागरीक आणि शेतकरी संघटना यांचेकडून प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वैध मापन विभागाने सहकारी व खाजगी साखर कारखान्यांवर असलेल्या काट्यामध्ये नियमित तपासणी करुन फेरफार करणाऱ्या किती कारखान्यावर गुन्हे दाखल केले आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार साखर कारखान्यांमधील वजन काट्यामध्ये फेरफार करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१६-०६-२०२३) :** (१) होय, उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, सांगली, कोल्हापूर व सोलापूर यांचे कार्यालयाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) व (३) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी साखर कारखान्यांच्या वे-ब्रिज ची तपासणी करण्यासाठी एक पथक गठीत केले होते. सदर पथकाकडून सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या वे-ब्रिज ची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये दि. १४/१/२०२२ रोजी अथणी शुगर कारखाना येथे उत्पादकाच्या ऊस वाहन ट्रकचे वजन २४४५० किलोग्रॅम असतांना त्यांना २३४२० किलोग्रॅम वजनाची पावती दिल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर कारखाना व संचालकांवर वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ च्या कलम ३० (सी) अन्वये खटला नोंदविण्यात आला होता.

सदर खटला सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, पुणे विभाग यांचेस्तरावर तडजोडीन प्रशमीत करुन निकाली काढण्यात आला असून, सदर कारखाना व त्यांचे १५ संचालक यांचेकडून रुपये ८०,०००/- एवढा दंड (प्रशमन शुल्क) वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे-नंदुरबार (ता.नवापूर, जि.नंदुरबार) जिल्ह्याच्या सीमेवरील चरमाळ घाटात होणाऱ्या अपघातांबाबत

**(२२) ५४६८७ (१८-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे-नंदुरबार जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या नवापूर तालुक्यातील चरमाळ घाटातील तिव्र उतारावर खाजगी व राज्य महामंडळाच्या बसेस तसेच जड वाहतूक करणा-या वाहनांमुळे अपघात होऊन जीवित आणि वित्त हानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर घाटाची दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव मागविला आहे काय, असल्यास सदरचे काम शासकीय पातळावर मंजूर करुन निधी उपलब्ध करुन दिला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०६-२०२३) :** (१) चरणमाळ घाट तीव्र उताराच्या वनक्षेत्रातून जाणारा रस्ता आहे. सदर घाटात मागील तीन वर्षात तीन अपघात झाल्याची संबंधित पोलीस स्टेशनला नोंद आहे.

(२) सदर घाटाच्या भौमित्तिक व अभियांत्रिकी सुधारणा करण्याकरीता रक्कम रु. १८ कोटीचे काम मंजूर करण्यात आले आहे. आवश्यक परवानग्या प्राप्त करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमराण-बिलगव्हाण-चिंचपाडा-सोनारे-तारापूर (ता.नवापूर, जि.नंदुरबार) रस्त्याच्या बांधकामाबाबत

**(२३) ५४७६६ (१८-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमराण-बिलगव्हाण-चिंचपाडा-सोनारे-तारापूर (ता.नवापूर, जि.नंदुरबार) रस्त्याच्या बांधकामासाठी सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात आदिवासी विकास विभागामार्फत निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यासाठी किती निधी मंजूर करण्यात आला आहे काय तसेच या रस्त्याच्या बांधकामासाठी निवीदा मंजूर करण्यात आली आहे काय व रस्त्याचे काम पूर्ण करणेसाठी कोणत्या एजन्सीला व कधी देण्यात आले आहे,

(३) असल्यास, सदर ठेकेदाराने काम पुर्ण न केल्यास त्या ठेकेदाराचे नांव काळ्या यादीत समाविष्ट करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कामास मार्च, २०२० च्या पुरवणी अर्थसंकल्पात रु.५०.०० लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे.

सदर कामाकरिता निविदा प्रक्रीया पूर्ण करुन दिनांक १०.०५.२०२१ रोजी मे. निलेश कंन्स्ट्रक्शन यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

(३) सद्यस्थितीत सदरचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन, जालना, रांजणी, परतूर, जांब समर्थ, कुंभार पिंपळगाव व वडीगोद्री (ता.परतूर,जि.जालना) रस्त्याच्या निकृष्ट बांधकामाबाबत**

**(२४) ५६४६२ (१९-०१-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन, जालना, रांजणी, परतूर, जांब समर्थ, कुंभार पिंपळगाव व वडीगोद्री (ता.परतूर,जि.जालना) रामा २२३ किमी ८४/६०० ते ९४/६०० या रस्त्याची सुधारणा व दोन वर्षांसाठी देखभाल दुरुस्तीचे (किंमत ३ कोटी रु) काम संबंधित कंत्राटदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रामा २५३ ते रायपूर-खांडवी-शिरसगाव-रंगोपंत-टाकली ते शेलगाव रस्ता किमी ०/०० ते १६/८०० प्रजिमा २७ व परतूर-आंबा-बाबुलतारा ते प्ररामा ०२ रस्ता, प्रजिमा २९ किमी १/५०० ते ३/५०० या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे देखील निकृष्ट दर्जाची केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराचे रजिस्ट्रेशन रद्द करणे, निकृष्ट दर्जाचे काम करून शासनाच्या पैशाचा अपव्यय केल्याप्रकरणी सदरील रक्कम सक्तीने वसूल करुन कंत्राटदारास काळ्या यादीत टाकणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदरची कामे निविदेतील मानकाप्रमाणे झालेली असून, माहे डिसेंबर-२०२० अखेर पूर्ण झाली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-अहमदाबाद महामार्गासाठी संपादित केलेल्या सातिवली व हालोली (जि.पालघर) गावातील आठ शेतक-यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(२५) ५६६५९ (२४-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या सातिवली व हालोली (जि.पालघर) या गावातील आठ शेतक-यांना तीन वर्ष उलटूनही जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी मंजूर असलेल्या रक्कमेपेक्षा भूधारकांना द्यावयाच्या रक्कमेच्या मोबदल्याची रक्कम अधिक असल्यामुळे प्रशासकीय मान्यतेसाठी सदर रक्कमेचा प्रस्ताव MoRTH (रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय) कडे पाठविण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रक्कमेच्या प्रस्तावास मंजूरी मिळाली असून यास क्षेत्रीय अधिकारी मुंबई यांच्याकडून मंजूरी मिळाल्यावर सदर मोबदल्याची रक्कम सक्षम प्राधिकारी, डहाणू यांच्याकडे जमा करुन मोबदला देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रक्कम उक्त शेतकऱ्यांना कधीपर्यंत देण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०६-२०२३) :**(१) मुंबई अहमदाबाद महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या सातिवली व हालोली येथील मिसिंग सर्वे मधील ६ शेतक-यांना जानेवारी २०२३ पर्यंत मोबदला वाटप करण्यात आलेला नाही.
(२) होय.
(३) होय.

मिसिंग सर्वे नंबरचा निवाडा घोषित केल्यानुसार मोबदल्याची रक्कम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून सक्षम प्राधिकारी, डहाणू यांच्याकडे जमा करण्यात आली आहे.
(४) सहा शेतक-यांपैकी संबंधित तीन खातेदारांना मोबदला वाटप करण्यात आला आहे. दोन खातेदारांना नोटीसी देऊन नुकसान भरपाईसाठी लागणारी कागदपत्रे त्यांनी सादर केलेली नाहीत व एका खातेदाराचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथील सारथी व महाज्योतीच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थीनी मातोश्री वसतीगृह योजनेपासून वंचित राहिल्याबाबत

**(२६) ५७०६६ (१३-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील उच्च तंत्रशिक्षण विभागाने दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार मातोश्री वसतीगृहाबाबत सारथी व महाज्योतीसोबत करार करुन प्रवेश प्रक्रियेचे निर्देश देवूनही सारथी आणि महाज्योतीच्या निष्काळजीपणामुळे राज्यातील मराठा कुणबी, ओबीसी आणि आर्थिक दुर्बल घटकातील २०० विद्यार्थींनी मातोश्री वसतीगृह योजनेपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विद्यार्थीनी मातोश्री वसतीगृह योजनेपासून वंचित राहिल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास उपोषणाला बसणार होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील वसतीगृह हे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल, २०२२ नुसार अन्वये ७५-७५ इतर मागास प्रवर्ग व मराठा कुणबी समाजाच्या विद्यार्थीनी तर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आर्थिक दुर्बल घटकांमधील ५० विद्यार्थीनी अशा २०० विद्यार्थीनींसाठी निश्चित केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन वसतीगृहामध्ये विद्यार्थीनींना प्रवेश देण्याकरिता व २०० विद्यार्थीनींना वसतिगृह योजनेपासून वंचित ठेवल्याप्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०७-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर वसतिगृह सारथी व महाज्योती या महामंडळामार्फत सुरु करुन विद्यार्थींनीना प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर व गोंडवाना विद्यापीठा गडचिरोली येथून पेट परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना पी.एच.डी. गाईड मिळत नसल्याने विद्यापीठाने गाईड उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) ५७४४९ (२४-०४-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,नागपूर व गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली येथून पेट परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. गाईड मिळत नसल्याने विद्यापीठाने गाईड उपलब्ध करून द्यावा या मागणीसाठी हिवाळी अधिवेशनात मोर्चा काढण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,नागपूर व गोंडवाना विद्यापीठात पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना गाईड उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, नागपूर या विद्यापीठात पीएच.डी. संशोधकांच्या मार्गदर्शकास विद्यापीठाने निर्गमित केलेल्या निर्देशानुसार कमीत कमी ५ वर्ष पद्व्युत्तर शिक्षक/ १० वर्ष पदवी शिक्षक म्हणून विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक असते. ही अट पूर्ण होत नसल्यामुळे तसेच विषयांमध्ये नियमित प्राध्यापक उपलब्ध नसल्याने काही विषयांसाठी मार्गदर्शक उपलब्ध होऊ शकत नाहीत. तथापि, ज्या संशोधकास मार्गदर्शक उपलब्ध होऊ शकत नाही अशा संशोधकांनी Interdisciplinary Research मधील मार्गदर्शक घेऊन आचार्य पदवी करीता त्यांच्या पात्रतेनुसार नामांकन करण्याची तरतूद विद्यापीठाच्या निर्देश क्र.१९/२०२२ परि. क्र.६ मध्ये करण्यात आलेली आहे

तसेच, गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत एकूण ३० संशोधन केंद्रे असून विषयानुरुप उपलब्ध पी.एच.डी. मार्गदर्शकांची अद्यावत यादी विद्यापीठामार्फत संकेतस्थळावर प्रकाशित केली जाते.उपलब्ध मार्गदर्शक यांना नियमानुसार आखून दिलेल्या विद्यार्थी संख्येप्रमाणे पेट परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थाला प्रवेश देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२८) ५७९७१ (२५-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालयातील अनेक पदे रिक्त असल्याने या तालुक्यातील अनेक रस्त्यांची, शासकीय इमारतींच्या दुरुस्तीची व इतर कामे नियमित होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच भंडारकवठे ते बाळगी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती ठेकेदाराने न केल्याने अपघातात वाढ होऊन मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाल्याने येथील स्थानिकांनी प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भंडारकवठे ते बाळगी तसेच दक्षिण सोलापुर जिल्ह्यातील सर्व नादुरुस्ती कामांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना/कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही,
दक्षिण सोलापूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयातील पदे भरलेली असून रस्त्याची व शासकीय इमारतीच्या दुरुस्तीची कामे नियमितपणे होत आहेत.
(२) हे खरे नाही,
भंडारकवठे ते बाळगी या सात किलोमीटर मधील रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असून मे २०२३ अखेरपर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. स्थानिकांचे आंदोलनाचे कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२९) ५८१४३ (२५-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामंडळाच्या कक्षेत कोणकोणत्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे तसेच महामंडळाच्या निधीबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२०/प्र.क्र.१०७/नियो-१अ,दि.२२.०५.२०२३ अन्वये "महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ" स्थापन करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) या मंडळामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील तालुका व तालुका जोडणारे रस्ते, जास्त वाहतूक वर्दळ असलेल्या किंवा पर्यटन स्थळांना जोडणाऱ्या प्रमुख राज्यमार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग यामधून तसेच विविध योजनांमधून रस्ते सुधारणा करण्यात आलेल्या रस्त्यांची वाहतूक वर्दळ विचारात घेऊन प्रकल्पामध्ये निवड करण्यात येईल.
सार्वजनिक खाजगी भागीदरीची कामे राबविण्यासाठी सदर महामंडळ मुख्यत्वेकरुन इतर राज्यात काम करेल आणि शासन ते शासन जमा योगदान प्रकल्पांसाठी काम करेल.
(३) प्रकल्पांसाठी निधी उभारणी –
(अ) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील वापरात नसलेल्या विविध मालमत्तांचे निश्चलीकरण करुन निधी उभारण्यात येईल.
(ब) विभागाच्या मालकीच्या रस्त्यांच्या जागेतून जाणाऱ्या सेवा वाहिनीचे भुईभाडे, जोडरस्त्यांच्या परवानग्यांवर आकारण्यात येणारे शुल्क, जाहिरातींच्या हक्काच्या बदल्यात मिळणारे भुईभाडे तसेच कर्ज स्वरुपातील निधी अशाप्रकारे विभागामार्फत विविध स्त्रोत्रांद्वारे संकलन करुन पूरक निधीची उभारणी करण्यात येईल.
(क) गौण खनिजावर अतिरिक्त अधिभार लावणे, रस्त्यांच्या दोन्ही बाजूच्या जागांवर वृध्दीशुल्क लावणे, रस्त्यांच्या बाजूच्या जमिनीच्या खरेदी-विक्रीवर मुद्रांकशुल्क लावणे तसेच मोटार वाहन शुल्कावर अतिरिक्त अधिभार लावणे याबाबत महसूल व वन विभाग आणि परिवहन विभागाशी विचारविनिमय करुन त्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करुन त्याद्वारे निधी उभारण्यात येईल.
(ड) विभागाच्या ताब्यातील शासकीय जमिनी वापरासाठी व व्यापारी तत्वावर विकसित करण्यासाठी भाडेतत्वावर देणे व त्याद्वारे मिळणारे उत्पन्न आणि आर्थिक लाभ प्रकल्पांची निवड करुन निधी उपलब्ध करण्यात येईल.

---

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पुस्तके पुरविणेबाबत

**(३०) ५८६३९ (२४-०४-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठा अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना घरपोच पुस्तके देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेऊनही त्याची अंमलबजावणी न झाल्याने विद्यार्थ्यांना पुस्तकाविना परीक्षा देण्याची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची आणि इतर भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण राहिल्यास त्यांना मुक्त विद्यापीठातून संधी मिळत असतानाही प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे विद्यापीठाच्या ज्ञानगंगा घरोघरी या ब्रीद वाक्याला बगल दिली जात आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार विद्यार्थ्यांना तातडीने घरपोच पुस्तके देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१२-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठात नव्याने विकसित केलेल्या व जुन्या सर्व शिक्षणक्रमांची पुस्तके सॉफ्टकॉपीव्दारे PDF/E-book स्वरुपात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून संबंधित अभ्यासकेंद्रांमार्फत पुस्तके उपलब्ध केली जातात. चालू शैक्षणिक वर्षासाठी सत्रनिहाय शिक्षणक्रमांची पुस्तके विद्यापीठाच्या विभागीय केंद्रामार्फत अभ्यासकेंद्रावर व अभ्यासकेंद्रामार्फत विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आलेली आहेत.

विद्यापीठामध्ये एम.ए. (अर्थशास्त्र) हा शिक्षणक्रम नव्याने विकसित करण्यात आलेला आहे. या शिक्षणक्रमाच्या तिसऱ्या सत्राची पुस्तके काही तांत्रिक कारणामुळे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली नसल्यामुळे या शिक्षणक्रमाची फक्त तिसऱ्या सत्राची परीक्षा काही कालावधीकरिता पुढे ढकलण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यापीठात नव्याने विकसित केलेल्या व जुन्या सर्व शिक्षणक्रमांची पुस्तके सॉफ्टकॉपीव्दारे PDF/E-book स्वरुपात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून पुस्तके उपलब्ध करूनच परीक्षा घेण्यात आल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील प्रलंबित रस्त्यांची कामे पुर्ण करण्याबाबत

**(३१) ५८९६३ (२५-०४-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील घाटमाथ्यावरील सर्व प्रलंबित रस्त्यांचे काम तात्काळ सुरु व्हावे याकरिता बोलठाण परिसरासह सर्व गावातील नागरिकांनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी पासून बेमुदत आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रलंबित रस्त्यांची कामे तात्काळ पुर्ण करणे तसेच सदर कामे प्रलंबित ठेवणा-या संबधित अधिकारी व ठेकदारांविरुध्द कारवाई होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर सस्त्याचे प्रलंबित काम संबंधित कंत्राटदाराने दिनांक २३/०१/२०२३ पासून सुरु केल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वणी नांदेपेरा, रा.मा. ३१७ (जि.यवतमाळ) या मार्गाच्या दुरुस्तीच्या कामाबाबत

**(३२) ६००४९ (२५-०४-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी नांदेपेरा (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील रा.मा.३१७ या मार्गावरील १७२/१०० ते १८१/७०० कि.मी मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पॅचेस बुजविण्याचे काम करण्यात येत असून सदर काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने या रस्त्याची दुरवस्था होऊन जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी-डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांसह विविध संघटनांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने उक्त रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलबांची करणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१६-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय,

(३) सदर काम मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पात मंजुर असून,निवीदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्ववत नाही.

---

### गडचिरोली जिल्हयातील रास्त भाव दुकानदारांचे कमिशन थकित असल्याबाबत

**(३३) ६०३०८ (२४-०४-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात रास्त भाव दुकानदारांचे माहे फेब्रुवारी, २०२२ पासुन धान्य विक्रीच्या मोबदल्यात मिळणारे कमिशन थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रास्त भाव दुकानदारांचे कमिशन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच केलेल्या कार्यवाहीचा तपशिल काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाच्या विविध आदेशांनुसार फेब्रुवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीतील PMGKY योजनेअंतर्गत धान्य वाटपचे अनुज्ञेय असलेले कमिशन अदा करण्यात आले जिल्हा पुरवठा कार्यालय, गडचिरोली यांना अदा करण्यात आले आहे.

तसेच, जिल्हा पुरवठा कार्यालय, गडचिरोली मार्फत फेब्रुवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ पर्यंतच्या PMGKY योजनेचे धान्य वाटपाचे सर्व कमिशन रास्त भाव दुकानदारांच्या खाती जमा करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्ह्यातील शिवभोजन थाळी योजनेचे अनुदान प्रलंबित असलेबाबत

**(३४) ६१६८४ (२४-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरासह जिल्ह्यामध्ये सुमारे ४३ शिवभोजन केंद्र असून दररोज सुमारे ४ हजार ८०० थाळ्या सदर योजनेअंतर्गत वितरित केल्या जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेमधील कोल्हापुर जिल्ह्यातील शिवभोजन केंद्र चालकांचे सुमारे ३ ते ४ महिन्यांचे अनुदान प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढती महागाई तसेच शासनाने शिवभोजन केंद्रांचे अनुदान थकविल्यामुळे केंद्र चालकांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने दरमहा शिवभोजन थाळी चालकांना नियमितपणे अनुदान देणेबाबत कोणत्या उपपाययोजन केल्या वा करण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१२-०६-२०२३) :** (१) होय.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यासाठी आर्थिक वर्षे २०२२-२३ मध्ये एकूण रु. ७,५१,४४,००० एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच दि. १५ मार्च, २०२३ पर्यतची देयके अदा केली आहेत. तद्नंतरची देयके अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शिक्षणाधिकारी कार्यालय कार्यान्वित करणे बाबत

**(३५) ६१९२० (२६-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शिक्षणाधिकारी कार्यालय उभारण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षणाधिकाऱ्यांची नविन पदे निर्माण करण्यात आलेली आहेत हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात कोणत्या योजना कार्यान्वित होणार आहेत,
(४) असल्यास, सदर योजना कार्यान्वित होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शासन निर्णय दि.२२.६.२०२२ मध्ये नमूद करण्यात योजना कार्यान्वित होणार आहेत.
४) सदर योजना सुनियोजित पध्दतीने कार्यान्वित करण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाने मुंबई आणि उपनगरामध्ये ''आयडॉल''तर्फे पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी गैरसोय होत असल्याबाबत

**(३६) ६२०१९ (२६-०४-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाने मुंबई आणि उपनगरामध्ये ''आयडॉल''तर्फे पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी मुक्त शिक्षण संस्थेत (आयडॉल) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये याकरीता उपकेंद्रे चालू करण्यात आली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त उपकेंद्रातून विद्यार्थ्यांना अपेक्षित सुविधा मिळत नसल्यामुळे निकालाची प्रत आणि उर्वरित पुस्तके घेण्यासाठी मुंबई विद्यापीठात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपकेंद्रात सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी मागणी पदवी व पदव्युत्तर मुक्त शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून होत असतांनाही मुंबई विद्यापीठाकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने आयडॉलच्या उपकेंद्रातून सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या सोयीकरीता चर्चगेट, ठाणे, कल्याण, रत्नागिरी आणि सावंतवाडी येथे विभागीय उपकेंद्रे सुरु करण्यात आली आहेत. तसेच विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील अनेक संलग्नित महाविद्यालययात १०० हून अधिक अभ्यासकेंद्रेही सुरु आहेत.
(२) हे खरे नाही.
मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेमार्फत विभागीय उपकेंद्रावर विद्यार्थ्यांना साहित्य देण्यात आलेले आहे. सुलभ संदर्भासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही हे अध्ययन साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच संस्थेमधील ३५ पेक्षा जास्त शिक्षक वर्गांनी त्या त्या विषयाच्या टेलिग्राम चॅनलमधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन केले आहे. निकाल जाहिर झाल्यानंतर निकालाची प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तात्काळ उपलब्ध करुन दिली जाते आणि दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या कार्यालयातून विभागीया उपकेंद्रावर गुणपत्रिकांसह इतर शैक्षणिक सोयीसुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिल्या जातात.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार ते धडगांवला जोडणारा महत्वपूर्ण चांदसैली घाटाच्या दुरुस्ती बाबत

**(३७) ६२०४० (२५-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार व धडगांवला जोडणारा महत्वपूर्ण अशा चांदसैली घाटातील सुरक्षा भिंत बांधून व रस्ता दुरुस्तीचे कामास अद्याप सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घाटाच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी घाट बंदचे आदेश दिल्यामुळे प्रवाशांना सुमारे ४० कि.मी. फेऱ्याने शहादा मार्गे नंदुरबारला जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घाटाच्या दुरुस्तीच्या कामास कधी सुरुवात होणार आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, नंदूरबार यांनी दिनांक ०८/१२/२०२२ ते दि.०८/०१/२०२३ पर्यंत सदर रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने अवजड वाहनांसाठी बंद केलेला होता. मात्र लहान वाहनांसाठी वाहतूक अनुज्ञेय होती.
(३) नंदूरबार व धडगांवला जोडणा-या चांदसैली घाटातील संरक्षक भिंत बांधणे व रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणे या मंजूर कामांची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन सदर कामे लवकरच कार्यान्वीत करण्याचे नियोजन आहे.

---

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीक्षेवर बहिष्कार घातल्याबाबत

**(३८) ६२२३२ (२६-०४-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकृषि विद्यापीठे व महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी महासंघाने त्यांच्या विविध मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत परीक्षांवरील बहिष्कार कायम ठेवणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा रद्द करण्यात आलेला शासन निर्णय पुनर्जिवित करणे, सातव्या वेतन आयोगातील ५८ महिन्याची थकबाकी मिळावी तसेच सातव्या वेतन आयोगापासून वंचित असलेल्या १४१० विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावा आदी मागण्या या कर्मचाऱ्यांनी केल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या होणाऱ्या परीक्षेचे फेरनियोजन केले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०५-०६-२०२३) :** (१), (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दि.१५.०२.२०२३ रोजी मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार अकृषि विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याचा निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आला आहे. तसेच उर्वरित पदांना सातवा वेतन आयोग लागू करणे, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत लागू करणे यासंदर्भात निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग-रोहा-साई (जि.रायगड) रस्त्याच्या प्रलंबित कामाबाबत

**(३९) ६२२८९ (२५-०४-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग-रोहा-साई (जि.रायगड) रस्त्याच्या कामाला हायब्रीड अॅन्युटी मॉडेल (हॅम) योजनेअंतर्गत मंजूरी देण्यात आली असूनही गत तीन वर्षापासून सदर रस्त्याचे काम प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे वाहनचालकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यां विरूध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०६-२०२३) :** (१) सदर कामास दि.२५/११/२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. तथापि सदरचे काम दि.२२/०३/२०२३ पासून सुरु करण्यात आले आहे. सद्यस्थितीत संबंधित कंत्राटदारामार्फत १०% काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत काम प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पेण-खोपोली (राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६) (जि.रायगड) लगत असलेल्या आंबेघर ते कामार्ली मार्गातील रस्त्यासाठी भूसंपादित जमीनीचा योग्य मोबदला देण्याबाबत

**(४०) ६२४०८ (२५-०४-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पेण-खोपोली (राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६) लगत असलेल्या आंबेघर ते कामार्ली मार्गातील रस्त्याच्या रूंदीकरणासाठी १०० वर्षापेक्षा अधिक काळापासून वहिवाट असलेल्या स्थानिकांची घरे, दुकाने, शेती व वहिवाटीने कब्जे हक्कात असलेल्या जमीनी जाणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता रूंदीकरणामुळे पाण्याच्या निचऱ्याचा प्रश्न निर्माण होवून स्थानिकांचे व शेतीचेही नुकसान होणार असून बाजारपेठही संपुष्टात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्ता रूंदीकरणाच्या मार्गातील बाधितांना योग्य मोबदला मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

रायगड जिल्हयातील पेण-खोपोली (राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६) मधील तरणखोप ते खोपोली या भागात पुर्व भुसंपादित हद्दीमध्ये वळण सुधारणेकरिता व सेवा रस्त्यासाठी नव्याने भुसंपादन प्रस्तावित आहे.

आंबेगाव ते मांगरूळ या भागातील महामार्गाचे काम झालेले असून कामार्ली व वाकृळफाटा या भागात महामार्गाच्या पूर्व भूसंपादित अस्तित्वातील ३० मिटर हद्दीतील केवळ १८ मिटर रुंदीत महामार्गाचे काम होत असल्याने या भागातील बाधित अतिक्रमणे हटवणे आवश्यक आहे.

(२) हे खरे नाही.

महामार्गाचे दर्जोनत्ती कामी जुन्या अस्तित्वातील मोऱ्या/ लहान पूल / मोठे पूल/आवश्यकतेनुसार गटार यांचे नव्याने बांधकाम करण्यात येत असल्याने स्थानिकांचे व शेतीचे नुकसान होण्याचा व बाजारपेठ संपुष्टात येण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे आहे.
(४) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ०२.१२.२०२२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार कामार्ली व वाकृळफाटा या भागातील अतिक्रमित बांधकामांचे फेर संयुक्त सर्वेक्षण करून त्याचा अहवाल उप विभागीय अधिकारी, पेण यांचे कडे पुढील उचित कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाचोरा-भडगांव (जि.जळगांव) येथील पुल व रस्त्यांच्या बांधकामाबाबत

**(४१) ६२५१७ (२५-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा-भडगांव (जि.जळगांव) येथील लोहटार बांबरुड रस्ता इमा-५८ वर किमी ३/०० मध्ये बाबंरुड गावाजवळ गिरणा नदीवर पुल व जोडरस्ता, परधाडे-पाचोरा रस्ता प्रजिमा-४६ वर किमी ७५/४०० मध्ये परधाडे गावाजवळ गिरणा नदीवर पुल व जोडरस्ता तसेच भातखंडे खु इजिमा ५७ (ता.पाचोरा) ते भातखंडे बु. (ता.भडगांव) दरम्यान गिरणा नदीवर पुल व रस्त्याचा समावेश करण्याकरिता मा.मुख्यमंत्री यांनी दि.२५.७.२०२२ रोजीच्या सुमारास अवर मुख्य सचिव (सार्व.बांधकाम) यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच मौजे होळ येथे तितूर नदीवर पुल व मौजे वडगांव असेरी (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथे हिवरा नदीवर पूल कम बंधाऱ्याच्या कामास मंजूरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.८.११.२०२२ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या रस्त्यांच्या कामांना मंजूरी देऊन त्यांचा अर्थसंकल्पात समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) प्रश्नाधीन रस्त्यांच्या तसेच पुलांच्या कामाबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा-भडगांव विधानसभा मतदार संघातील रेल्वे ओव्हर ब्रीज ला विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याबाबत**

**(४२) ६२५२२ (२८-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा-भडगांव विधानसभा मतदार संघातील रेल्वे ओव्हर ब्रीज (आरओबी) ला सन २०२२-२३ च्या पूरवणी अर्थसंकल्पात समाविष्ट करुन विशेष बाब म्हणून मंजूरी देऊन निधी उपलब्ध होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जुलै, २०२२ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रश्नाधीन पूलाच्या बांधकामाबाबत निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत करण्यात येणारी कामे निकृष्ठ दर्जाची होत असल्याबाबत**

**(४३) ६३००२ (२५-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारणी तालुका (जि.अमरावती) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत जुटपाणी-ढाकणा, ढाकना ते सेलू फाटा, बैरागड रोड, राणीगांव रोड, टीटंबा रोड, जुटपाणी ते बारु तसेच इतर अनेक रस्त्यांच्या डांबरीकरण व पॅचेस भरण्याची कामे जोरात सुरु असुन सदर कामावर सार्वजनिक बांधकाम उपविभागाचा कोणताही अभियंता किंवा तांत्रिक सहायक नसल्याने संबंधित ठेकेदार सदर काम निकृष्ट दर्जाचे करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामांवर बांधकाम अभियंता किंवा कर्मचारी उपस्थित रहात नसल्याने अपघात होत असून या दोषयुक्त कामांमुळे शासनाच्या पैशाचा अपव्यय देखील होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१६-०६-२०२३) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.
उपविभागाअंतर्गत उपअभियंता तथा कनिष्ठ अभियंता हे वेळोवेळी कामावर हजर राहून त्यांचे देखरेखीखाली कामे

करण्यात येतात.तसेच साहीत्यांच्या तपासण्या करुन कामामध्ये साहीत्य वापरण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## नांदेड येथील गुरुतांगद्दी विकासकामांतर्गत कामठा माता साहेब ते मुदखेड रस्त्याच्या बांधकामाची रक्कम कंत्राटदाराला अद्याप दिली नसल्याबाबत

**(४४) ६३२६० (२५-०४-२०२३). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवलीतील मोरेश्वर बिल्डर्स व डेव्हलपर्स या कंपनीने नांदेड येथील गुरुतांगद्दी विकासकामांतर्गत कामठा माता साहेब ते मुदखेड रस्ता आणि देगलूर नाका ते आसनापूर या दोन रस्त्यांचे बांधकाम सन २०१० मध्ये पूर्ण केले असून अद्याप सदर बांधकामाचे कंपनीला ६ कोटी ६ लक्ष रुपये सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी २४ कोटी ६६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाने कंपनीला १५ कोटी ६३ लाख रुपये सन २०२० पर्यंत अदा केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २९ जुलै, २०१३ रोजी तीन सदस्यीय समिती मार्फत या कामाची मोजणी करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय,

कंत्राटदाराने केलेल्या कामाचे देयक अदा करण्यात आले.

(३) होय, हे खरे आहे.

(४) संबंधित कंत्राटदारास अंतिम देयक अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याचे माजी मुख्य सचिव श्री जे.पी. डांगे यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून सिध्दार्थ विधी महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयास दंड करून महाविद्यालयाची संकेतस्थळे बंद केल्याबाबत

**(४५) ६३२८९ (२६-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिध्दार्थ विधी महाविद्यालय, मुंबई येथे श्री. चंद्रा विजय, IRS यांनी एल.एल.बी. ३ वर्षे कोर्सच्या पहिल्या वर्षाकरिता प्रवेश मिळण्यासाठी अर्ज केला होता हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रवेश अर्जास कोणत्याही प्रकारचे पूर्वीचे शैक्षणिक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र जोडलेले नसून केवळ सीईटी प्रवेश फॉर्म जोडून प्रवेश देण्याची मागणी केली होती हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत महाविद्यालयाने प्रमाणपत्रांची मागणी केली असता श्री. चंद्रा विजय यांनी सदरची कागदपत्रे हरविली असून तसे प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत मागितल्यानंतरही त्यांनी उक्त मुदतीत कागदपत्र सादर केली नसल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी राज्य प्रवेश नियामक प्राधिकरण (CET CELL) यांनी दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास सिध्दार्थ विधी महाविद्यालयास डुप्लीकेट प्रमाणपत्र तसेच बोर्ड प्रमाणपत्र दोन महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीवर श्री. चंद्रा विजय यांना विधी अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात यावा याकरीता पत्र पाठविण्यात आले होते,

हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, श्री. चंद्रा विजय राज्य प्रवेश नियामक प्राधिकरण (CET CELL) यांनी उक्त महाविद्यालयास पत्राने कळविल्याप्रमाणे महाविद्यालयामध्ये येऊन सदरची कागदपत्रे दाखल करण्याचे प्रतिज्ञापत्र सादर करुन देखील ते महाविद्यालयात प्रवेशासाठी उक्त मुदतीत आले नसल्याने राज्याचे माजी मुख्य सचिव, श्री.जे.पी.डांगे यांनी सिध्दार्थ महाविद्यालयाला १ लाख रुपये दंड भरण्याचे आदेश दिले हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, श्री. डांगे यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन बेकायदेशीरित्या श्री. चंद्रा विजय यांचे प्रवेशासाठीचे कागदपत्र नसताना प्रवेश देण्याचे दडपण महाविद्यालयावर टाकल्याप्रकरणी तसेच विनाकारण कॉलेजची संकेतस्थळे बंद केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) अंशत: खरे आहे. याबाबत ई-मेलद्वारे कळविण्यात आले आहे.
(५) अंशत: खरे आहे. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८ मधील कलम ९ (५) मधील तरतूदीनूसार महाविद्यालयाने प्रवेश प्रमाणित करण्याबाबतचा प्रस्ताव विहित मुदतीत सादर केला नसल्याने, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १८.४.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये महाविद्यालयास रु. १ लाख इतका दंड आकारण्यात आला.
(६) हे खरे नाही. महाविद्यालयाचे संकेतस्थळ हे स्वतंत्र असून ते प्रवेश नियामक प्राधिकरणाव्दारे बंद करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंधेरी (पूर्व) २६-ड शिधावाटप कार्यालयास कायमस्वरुपी जागा उपलब्ध करण्याबाबत**

**(४६) ६३३३५ (२४-०४-२०२३). श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (पूर्व) २६-ड शिधावाटप कार्यालय भाडयाचा जागेत सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भाडयाच्या जागेतील कार्यालय रिक्त करण्यास सांगण्यात आल्यामुळे सध्यस्थितीमध्ये शिधावाटप कार्यालय हे भाडेतत्वावर एम.टी.एन.एल कार्यालय, एम.आय .डी. सी. येथे चालविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालयास कायमस्वरुपी जागा उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०७-०६-२०२३) :**(१) होय
(२) माहे जून 2019, पासून शिधावाटप कार्यालय हे एम.टी.एन.एल कार्यालय, एम.आय.डी.सी. येथे कार्यरत आहे. सदर जागेतील कार्यालय रिक्त करण्याबाबत कोणत्याही यंत्रणेमार्फत सांगण्यात आलेले नाही.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी यांच्या अधिपत्याखालील असलेल्या, कार्यक्षेत्रात शिधावाटप कार्यालयास सामावून घेण्याकरीता शासकीय जागा उपलब्ध करुन देण्याबाबत उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ कार्यालयाने दि.०३.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. त्यानुषंगाने सदर शिधावाटप कार्यालया करीता शासकीय जागा उपलब्ध नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दि.०३.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

शिधावाटप कार्यालय क्र.२६/ड या कार्यालयास जागा उपलब्ध होण्याकरीता प्रयत्न करण्यात आले असून, काही

जागा अन्य आस्थापनेस मान्य झाल्याने, तर काही कार्यालयाचे क्षेत्रफळ कमी असल्याने उपलब्ध झालेल्या नाहीत.
(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर, पुणे व रत्नागिरी जिल्ह्यात हमालांकडून अतिरिक्त रक्कमेची मागणी होत असल्याबाबत**

**(४७) ६३७३७ (२६-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर, पुणे व रत्नागिरी जिल्ह्यात अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या धान्याची भारतीय खादृय मंडळाच्या गोदामामधून उचल करण्यात येत असून यासाठी करारानुसार हमाली ठरविली असतानाही हमालांनी प्रति क्विंटल मागे ३ रुपयांची अतिरिक्त मागणी केल्यामुळे या जिल्हयातील नागरीकांना धान्य मिळू शकले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अतिरिक्त हमाली मागणाऱ्यांवर कारवाई करुन अन्न सुरक्षा योजनेचा लाभ नागरीकांना नियमित मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
अहमदनगर,पुणे व रत्नागिरी जिल्हयातील भारतीय अन्न महामंडळाच्या हमाल कामगारांनी “वाराई” च्या मागणीसाठी काम बंद ठेवल्यामुळे अन्नधान्याची उचल विहीत कालावधीत पूर्ण होऊ शकली नाही. परंतु, शासनाकडून शिल्लक अन्नधान्याच्या उचलीस मुदतवाढ देण्यात आल्याने शिल्लक अन्नधान्य साठा पुढील महिन्यात पूर्णत: उचल करण्यात आल्याने त्याचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे कोणताही लाभार्थी धान्य मिळण्यापासून वंचित राहिलेला नाही.
(२) प्रस्तुत प्रकरणी दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी भारतीय अन्न महामंडळासोबत नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये हमाल कामगारांकडून होत असलेल्या “वाराई” च्या मागणीच्या अनुषंगाने भारतीय अन्न महामंडळातील संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्याकडून घेतलेली अनामत रक्कम परत न केल्याबाबत**

**(४८) ६३७४१ (२७-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्याकडून अनामत रक्कम घेतली जाते तसेच शिक्षण संपल्यानंतर विद्यार्थ्यांना सदर रक्कम परत केली जात नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च शिक्षण विभागाने माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान सर्व विभागीय सहसंचालक कार्यालयाकडून शिल्लक अनामत रक्कमेची माहिती मागविण्यात आली असता सुमारे ४५ कोटी २३ लाख ८९ हजार ९०२ रुपयांची रक्कम राज्यातील विविध महाविद्यालयाकडे पडून असुन या रक्कमेमध्ये ग्रंथालय, प्रयोगशाळा इत्यादी शुल्काचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रक्कम महाविद्यालयाने परत देणे अपेक्षीत असूनही देण्यात येत नसल्याने

विद्यार्थ्याचे आर्थिक नुकसान होत आहे तसेच या रक्कमेपैकी ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यासाठी विनियोगाची मागणीही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अशंत: खरे आहे.

(४) अनामत रकमेचा ईबीसी विद्यार्थ्यांच्या आर्थिक मदतीकरिता वापर करणेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील पदवीधारकांना पदवी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**(४९) ६३९०५ (२७-०४-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधारकांकडे पदवी प्रमाणपत्र नाही किंवा ज्यांचे पदवी प्रमाणपत्र गहाळ झाले आहे अशांना विद्यापीठाने अर्ज करुन पदवी प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत अर्ज सादर केलेल्या शेकडो पदवीधारांना अद्याप प्रमाणपत्र मिळाले नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ज्या पदवीधारकांनी अर्ज करून प्रमाणपत्र मिळाले नाही त्यांना विद्यापीठ सिनेट मतदार नोंदणीची मुदत संपण्याअगोदर प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१२-०६-२०२३) :** (१), (२) व (३)

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी पदवी प्रमाणपत्राची अट होती. या मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याची इच्छा असलेल्या परंतु पदवी प्रमाणपत्र अद्याप घेतले नसलेल्या किंवा पदवी प्रमाणपत्र गहाळ झालेल्या नागरिकांसाठी दि.12.01.2023 ते 17.01.2023 या कालावधीत पदवी प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज स्वीकारण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

मुंबई विद्यापीठा व्यतिरिक्त अन्य विद्यापीठांमध्ये अशी विशेष योजना राबविण्यात आलेली नाही.

मुंबई विद्यापीठाकडून रावबिण्यात आलेल्या विशेष मोहिमेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही होऊन अर्जदारांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आलेले आहेत.

या मोहिमेंतर्गत अर्ज करुनही पदवी प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यामुळे मतदार यादीमध्ये नाव नोंदणीपासून वंचित रहावे लागले आहे अशा आशयाची कोणतीही तक्रार विद्यापीठाच्या परिक्षा विभागाकडे प्राप्त नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहाय्यक शिक्षकांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत**

**(५०) ६४२१४ (२७-०४-२०२३). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १० शासकीय सराव पाठशाळा बंद करण्यात येऊन तेथील शिक्षकांचे समायोजन जिल्हा परिषदेतील आस्थापनेवर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समायोजनाला शिक्षकांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई व नागपूर येथे आव्हान दिल्याने

मा. न्यायालयाने समायोजन रद्द करून दिनांक १५ सप्टेंबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार समायोजन करण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार समायोजन झाल्याने सहाय्यक शिक्षक रुजु झाले असून या शिक्षकांचे समायोजन होण्यापूर्वीचे थकीत वेतन अद्यापपावेतो अदा करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, थकीत वेतन न मिळाल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या शिक्षकांना थकीत वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिपक केसरकर (१२-०६-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.

(२) अशंत: खरे आहे.

(३) हे खरे आहे. सहायक शिक्षक हे रुजू नसल्याने त्यांना सदर कालावधीचे वेतन अनुज्ञेय नाही.

(४) नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.